Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षाविषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचा अभ्यास

**प्रा. ईश्वर सिताराम बोरसे,** संशोधक विद्यार्थी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
**डॉ. तुषार मधुकर माळी,** सहायक प्राध्यापक, आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात, वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचा अभ्यास सर्वेक्षण संशोधन पद्धतीने केला आहे. सहेतुक नमुना निवड पद्धतीने शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील ९० (कला शाखा ३०, विज्ञान शाखा ३० व वाणिज्य शाखा ३०) विद्यार्थिनीची निवड करण्यात आली. वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचे मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित मापिका तयार केली आहे. त्यात एकूण २० विधाने होती. प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत व सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले आहेत. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षावरून असे दिसून येते की, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींमध्ये महिला सुरक्षा कायद्याबद्दल कला शाखेतील विद्यार्थिनींपेक्षा अधिक साक्षरता दिसून येते. तर विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींच्या महिला सुरक्षा कायद्यातील साक्षरतेत काही फरक दिसून येत नाही.

## प्रस्तावना

भारत हा विकासाच्या मार्गावर खूप वेगाने धावत आहे. सर्वच स्तरावर समृद्धी असावी या हेतूने कार्य सुरु आहे. शिक्षण, सामाजिक व्यवस्था, सुरक्षा आणि इतर सर्वच विभाग गतीने कार्यरत आहेत. पुरुषाबरोबर महिलांनीही आपले योगदान या विकासाच्या कामात दिले आहे. महिलांची भूमिका महत्वपूर्ण आहे. महिलांना शिक्षण आणि सुरक्षा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. परंतु आज देखील अनेक हिंसा महिलांसोबत घडताना आपण ऐकतो आहोत. हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार, नौकरीच्या ठिकाणी त्रास होणे असे अनेक घटना घडत आहेत. हे सर्व कुठे तरी थांबले पाहिजे या हेतूने सर्वच स्तरावरून अधिकाधिक प्रयत्न होणे आवश्यक आहेत. महिला सुरक्षा देशासाठी खूप महत्वपूर्ण आहे. हि गोष्ट लक्षात घेऊन आजमितीस, २६ नोव्हेंबर हा दिवस 'हुंडाबंदी दिन' म्हणून साजरा केला जातो, जेव्हा हुंडा देणे आणि घेणे हा कायद्याने गुन्हा ठरवला आहे. या कायद्याअंतर्गत प्रत्येक पोलीस स्टेशनला हुंडा प्रतिबंधक अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत आणि जिल्हा व तालुकास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. महिलांनी हुंडा मागणाऱ्यांविरुद्ध तक्रार केली पाहिजे. हुंडामध्ये मुलीला दिलेली सर्व वस्तू, कपडे, सोने, पैसे इत्यादींचा समावेश होतो. महिलांच्या संरक्षणासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, प्रांतअधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, गटविकास अधिकारी यांना अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. राज्यात महिलांसाठी ७२ आश्रयगृहे आणि ८२ सर्व्हिस प्रोव्हायडर्स मान्यता प्राप्त आहेत. महिला आयोग


Copyright © | JET Network, All Rights Reserved

महिलांच्या हक्कांचे रक्षण करत आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी ‘विशाखा गाईडलाईन्स’ लागू केल्या आहेत. यासाठी राज्यभर तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. महिलांच्या अवैध मानवी व्यापाराच्या विरोधात ‘कृतिदल’ स्थापन करण्यात आले आहे. देवदासी प्रथा आणि त्यांच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी तसेच मुलींच्या संख्येची समस्या सोडवण्यासाठी ‘गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक’ कायदा लागू आहे. या कायद्यानुसार गर्भातील लिंग तपासणी करणाऱ्याला दंड आणि शिक्षा दिली जाते. गरोदर महिलेला गुन्हा दाखल होत नाही. बालविवाह रोखण्यासाठी ग्राम स्तरावर ‘ग्राम बाल संरक्षण समिती’ कार्यरत आहे, ज्यामध्ये ग्रामसेवक, अंगणवाडी ताई, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश आहे. प्रत्येक जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंधक अधिकारी नियुक्त केले गेले आहेत. एकूणच, महिला आणि बालकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी विविध कायदे आणि योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. हे एवढे असून देखील महिला सुरक्षित राहत नाही त्यांच्यासाठी असलेले सुरक्षाविषयक कायदा त्यांना माहित असणे आवश्यक आहे म्हणूनच यासाठी प्रस्तुत संशोधन राबविण्यात आले आहे.

**समस्या विधान**

शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचा अभ्यास करणे.

**उद्दिष्ट**

वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

1. वरिष्ठ महाविद्यालयातील कला आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
2. वरिष्ठ महाविद्यालयातील कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
3. वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपद्धती**

- **संशोधन पद्धती-** प्रस्तुत संशोधनात वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.
- **जनसंख्या-**प्रस्तुत संशोधनात शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयात द्वितीय प्रवेशित सर्व विद्यार्थिनीची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली.
- **न्यादर्श-** प्रस्तुत संशोधनात सहेतुक नमुना निवड पद्धतीने शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील ९० (कला शाखा ३०, विज्ञान शाखा ३० व वाणिज्य शाखा ३०) विद्यार्थिनीची निवड करण्यात आली.
- **संशोधन साधने-** वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचे मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

महिला सुरक्षाकायदा विषयक साक्षरता मापिका तयार केली आहे. त्यात एकूण २० विधाने होती. प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत व सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते. सदर शोधिका तज्ञ मार्गदर्शक व मानसशास्त्र विषय शिक्षकांकडून तपासून घेण्यात आली आहे.

- **संख्याशास्त्रीय परिमाणे-** प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब करण्यात आला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**


प्रस्तुत संशोधनात वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचा अभ्यास करण्यासाठी स्वनिर्मित प्रश्नावल्या विद्यार्थिनीना देण्यात आल्या होत्या. त्यास दिलेल्या प्रतिसादावरून पुढील प्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आल्या.

**तक्ता क्रमांक ०१: परिकल्पना परीक्षण**

| वरिष्ठ महाविद्यालय | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| कला शाखेतील विद्यार्थिनी | 30 | 30.33 | 3.96 | २.०० | 3.79 | त्याग |
| विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी | 30 | 34.26 | 4.11 | | | |
| कला शाखेतील विद्यार्थिनी | 30 | 30.33 | 3.96 | | 2.27 | त्याग |
| वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनी | 30 | 32.64 | 3.91 | | | |
| विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी | 30 | 34.26 | 4.11 | | 1.56 | स्विकार |
| वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनी | 30 | 32.64 | 3.91 | | | |

**आलेख क्रमांक ०१**


Copyright © | JET Network, All Rights Reserved




**विश्लेषण व अर्थनिर्वचन**

**परिकल्पना 01:** स्वाधीनता मात्रा (58) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 3.79 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, वरिष्ठ महाविद्यालयातील कला आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. विज्ञान शाखेतील विद्यार्थिनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचा मध्यमान गुणांक हा कला शाखेतील विद्यार्थिनीपेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, विज्ञान शाखेतील विद्यार्थिनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरता कला शाखेतील विद्यार्थिनीपेक्षा अधिक दिसून येते.

**परिकल्पना 02:** स्वाधीनता मात्रा (58) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 1.56 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, वरिष्ठ महाविद्यालयातील कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेचा मध्यमान गुणांक हा कला शाखेतील विद्यार्थिनीपेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरता कला शाखेतील विद्यार्थिनीपेक्षा अधिक दिसून येते.

**परिकल्पना 03:** स्वाधीनता मात्रा (58) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 2.27 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही. विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

साक्षरतेचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक नाही. यावरून असे म्हणता येईल की, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेली साक्षरता सारखीच दिसून येते.

**निष्कर्ष**

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. विज्ञान शाखेतील विद्यार्थिनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरता कला शाखेतील विद्यार्थिनीपेक्षा अधिक दिसून येते.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरता कला शाखेतील विद्यार्थिनीपेक्षा अधिक दिसून येते.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीमधील महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेल्या साक्षरतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही. विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनीचा महिला सुरक्षा विषयक कायद्याविषयी असलेली साक्षरता सारखीच दिसून येते.

**निष्कर्षावर आधारित चर्चा**

प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षावरून असे दिसून येते की, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींमध्ये महिला सुरक्षा कायद्याबद्दल कला शाखेतील विद्यार्थिनींपेक्षा अधिक साक्षरता दिसून येते. तर विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींच्या महिला सुरक्षा कायद्यातील साक्षरतेत काही फरक दिसून येत नाही. शाळा आणि महाविद्यालये महिला सुरक्षा कायद्याविषयी समान साक्षरतेची पातळी सर्व शाखांमध्ये तयार करण्याचे प्रयत्न करत आहेत. याचा अर्थ असा की, जेव्हा विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थी समान साक्षरतेच्या स्तरावर आहेत, तेव्हा त्या दोन्ही शाखांमध्ये या विषयावर एकसारखा अभ्यास आणि अनुभव दिला जात आहे. यामुळे इतर शाखांमध्ये देखील अशाच प्रकारची समान साक्षरता निर्माण केली जाऊ शकते. महिला सुरक्षा कायद्यानुसार सर्व शाखांमध्ये समानपणे अभ्यासक्रम असावा, यासाठी सर्व शाखांमध्ये स्त्री विषयक आणि कायद्याचे शिक्षण अधिक प्रभावीपणे समाविष्ट करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांसाठी महिला सुरक्षा कायद्याबद्दल अधिक साक्षरता निर्माण करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालये कार्यशाळा, परिसंवाद आणि जागरूकता कार्यक्रम आयोजित करू शकतात. यामुळे विद्यार्थ्यांना कायद्याबद्दल अधिक माहिती मिळेल आणि त्यांना महिला सुरक्षा कशी महत्त्वाची आहे हे समजेल. साक्षरतेमधील फरक हे दर्शवते की प्रत्येक शाखेत लिंगभाव-संवेदनशील शिक्षण आणण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक शाखेमध्ये महिला अधिकार, कायदे, आणि समानता याबद्दल अधिक जागरूकता निर्माण केली जाऊ शकते. यासाठी शिक्षक व अभ्यासक्रम यांची परिणामकारकता महत्वाची आहे. सेमिनार, विविध कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाची देखील आवशक्यता आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

1. Best & Kahn. (2006). Research in Education (9th Ed). Delhi: Prentice Hall of India.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

2. Garrett, H .E. (2006). Statistics in Psychology & Education (1st Ed. Indian Reprint). Delhi: Sage Publication.
3. Kang, L. S., & Kaur, G. (2021). Contextual support and career aspirations of working women. South Asian Journal of Human Resources Management, 8(1), 54-78.
4. Kumar, Ranjit. (2011). Research Methodology a step by step guide for beginners (3rd Ed). New Delhi: Sage Publication.
5. Michael, S. (2020). A study of Women rights in India. International Journal of Creative Research Thoughts, 6.
6. Raja Kumar, P.G. (2013). Research Methodology (1st Ed.). Delhi: APH Publishing Corporation
7. Reddy, C. S., & Manak, S. (2005). Self-help groups: A keystone of microfinance in India-women empowerment and social security. Andhra Pradesh Mahila Abhivruddhi Society (APMAS). India: Hyderabad.


Copyright © | JET Network, All Rights Reserved